महानंद दुग्धशाळेच्या अधिकृत वितरकामार्फत या दुग्धशाळेचे दुध व इतर दुग्धजन्यपदार्थ मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानातून विक्रीसाठी ठेवण्यास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्र. साविव्य-२०१७/५६/प्र.क्र.२४/नापु-३१
मंत्रालय (विस्तार), मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १९ जानेवारी, २०१८

<u>वाचा :</u> १. शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक साविव्य-२०१६/८१४/प्र.क्र.३३५/नापु-३१, दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६.

२. शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक साविव्य-२०१७/प्र.क्र.५१/नापु-३१, दिनांक ३ मार्च, २०१७.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील रास्तभाव दुकानदारांचे उत्पन्न वाढावे यासाठी संदर्भाधिन दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये रास्तभाव/शिधावाटप दुकानातून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत होणाऱ्या वस्तूंसह गव्हाच्या विशिष्ट जाती, तांदळाच्या विशिष्ट जाती, खाद्यतेल/पामतेल, कडधान्ये डाळी, गहू, शेंगदाणे, रवा, मैदा, चणाडाळ व भाजीपाला इत्यादी खुल्या बाजारातील वस्तूंची विक्री करण्यास तसेच संदर्भाधिन दिनांक ३ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रमाणित बी-बियाणे विक्रीसाठी ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे.

याच धर्तीवर नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अधिपत्याखालील मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील अधिकृत रास्तभाव/शिधावाटप दुकानातून महानंद दुग्धशाळेचे दूध व दुग्धजन्यपदार्थ विक्रीसाठी ठेवण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :

रास्तभाव दुकानदारांचे उत्पन्न वाढावे यासाठी, महानंद दुग्धशाळेच्या अधिकृत वितरकांर्माफत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अधिपत्याखालील मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानामध्ये दुध व दुग्धजन्यपदार्थ विक्रीसाठी ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. महानंद दुग्धशाळेच्या अधिकृत वितरकांमार्फत रास्तभाव दुकानांपर्यंत दुध व दुग्धजन्य पदार्थांचे वितरण करण्यात येईल.

३. महानंद दुग्धशाळा योजनेप्रमाणे, दुध तसेच इतर दुग्धजन्य पदार्थाच्या विक्रीपोटी मिळणाऱ्या कमिशनसाठी संबधित रास्तभाव दुकानदारांनी महानंद दुग्धशाळेच्या संबंधित वितरकांशी परस्पर संपर्क साधणे आवश्यक राहील. हा व्यवहार महानंद दुग्धशाळा व संबंधित रास्तभाव दुकानदार यांच्यामध्ये राहील. यात शासनाचा कोणताही सहभाग अथवा हस्तक्षेप राहणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०११९१२०६४७११०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Deoman Baswant

Digitally signed by Sunil Deoman Baswant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=F.C.S and C.P. Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8883fe608dc825b4f80204357f8a6fadfe8507e0636b91f3c5fefef9c43acfe1, cn=Sunil Deoman Baswant
Date: 2018.01.19 12:12:44 +05'30'

(सु.दे.बसवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधामंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधामंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.राज्यपाल यांचे सचिव,
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६) मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
८) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
९) मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई-३२
१०) मा. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.
११) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला, चर्चगेट, मुंबई.
१२) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
१३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील सर्व सह सचिव,उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी.
१४) सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख, मंत्रालय, मुंबई-३२
१५) उपसंचालक पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
१६) उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा)परळ, मुंबई.
१७) महालेखापाल (लेखा/ अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१,मुंबई.
१८) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, वित्तीय सल्लागार व उप सचिव यांचे कार्यालय, मुंबई.
१९) महासंचालक, माहिती जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
२०) महासंचालक, यशवंतराव चव्हाण प्रशासन प्रबोधिनी, बाणेर रोड, पुणे.
२१) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई. (१०प्रती)
२२) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती)
२३) अध्यक्ष, ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकिपर्स फेडरेशन, पुणे, व्दारा गुप्ता जनरल स्टोअर्स,
२४) अन्सारी काट्यासमोर, काळभोर नगर, चिंचवड, पुणे ४११ ०१९.
२५) अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार, केरोसीन परवाना धारक महासंघ, साई भगित्रा निवास, एन-४ सिडको, ए.सी. प्लॉट नं.९, औरंगाबाद.
२६) अध्यक्ष, मुंबई रेशन दुकानदार संघटना, ओरिएन्टल हाऊस, ७ जे टाटा मार्ग, मुंबई.
२७) निवड नस्ती, कार्यासन ना.पू-३१.